# म. गांधींची विश्वस्त कल्पना
## (Gandhi's concept of trusteeship)

गांधी केवळ संत नव्हते, अर्थशास्त्रज्ञ म्हणून, अर्थशास्त्राच्या विचार व सिद्धांतात त्यांनी फार मोठी मौलिक भर घातली असे नव्हे पण भारतीय परिस्थितीच्या संदर्भात त्यांनी आपले आर्थिक मॉडेल म. गांधींना भारतीय संस्कृती व परंपरेचा अभिमान होता. रामाच्या राज्यात ज्याप्रमाणे सुबत्ता व सर्वत्र होती त्याप्रमाणे आदर्श राज्य या युगातही शक्य आहे, असे त्यांना वाटे. गांधीजींना त्यांच्या आदर्श राज्यात संपत्तीचे समान वाटप, बेकारीचे उच्चाटन, स्वालंबन, समता, न्याय इ. गोष्टी अभिप्रेत होत्या. आदर्श राज्यासाठी त्यांनी खालील घटकांची आवश्यकता सांगितली.

(1) स्वावलंबन (2) विश्वस्त व्यवस्था (3) विकेंद्रीकरण (4) समता

म. गांधींच्या आर्थिक विचारातील विश्वस्त योजना ही एक वैशिष्ट्यपूर्ण कल्पना आहे. गांधीजींच्या या संकल्पनेसंबंधी त्यांचे सहकारी किशोरलाल मश्रुवाला, नरहरी पारेख व प्रो. प्यारेलाल यांनी एक मसुदा 1942 साली गांधीजी स्थानबद्ध असताना तयार केला, गांधींनी त्यात थोडाफार बदल केले व ती योजना प्रसिद्ध केली, ती योजना "विश्वस्त योजना" या नावाने ओळखली जाते. मानवी स्वभावात परिवर्तन घडवून येणे मुळीच अशक्य नाही अशा श्रद्धेतून विश्वस्त वृत्तीच्या संकल्पनेचा उगम झाला आहे. माणसाच्या चांगुलपणावर हा सिद्धांत आधारलेला आहे. विश्वस्त संकल्पनेचे स्वरूप पुढील प्रमाणे आहे.

(1) **भांडवलदारांचे परिवर्तन घडवून आणणे** :- विश्वस्तवृत्ती ही भांडवलदारी समाजव्यवस्थेत परिवर्तन घडवून आणून समतावादी तत्त्वावर तिची पुनर्रचना करण्याचे एक साधन आहे. भांडवलदारीला तिच्यात मुळीच थारा नाही परंतु सध्याच्या भांडवलदार वर्गाला स्वतःची सुधारणा करण्याची तिच्यामार्फत संधी दिली जाणार आहे.

(2) **खाजगी संपत्तीचा हक्क नाही** :- विश्वस्त कल्पनेत व्यक्तीला खाजगी मालमत्तेचा हक्क राहील पण व्यक्तीला अधिक संपत्ती किंवा मालमत्ता बाळगण्याचा अधिकार असणार नाही.

गांधीजींच्या गरजा किती संपत्ती असावी याची मर्यादा ठरविली गेली

3) संपत्ती वापरावर कायदेशीर बंधने — विश्वस्त कल्पनेत संपत्तीची मालकी व वापर ~~आवर~~ यांच्यावर कायदेशीर बंधने घातली जातील. कोणत्याही व्यक्तीला आपली संपत्ती केवळ आपल्या सुखासाठी किंवा समाजहिताची पर्वा न करता धारण करता येणार नाही, वापरता येणार नाही किंवा साठा करता येणार नाही

4) कमाल व किमान उत्पन्नाची मर्यादा असेल :- समाजातील कोणत्याही व्यक्तीचे कमाल व किमान उत्पन्न किती असावे याबाबत मर्यादा घालणे आवश्यक आहे. कमाल व किमान उत्पन्नातील भेद वाजवी असावा, मर्यादित असावा हळू हळू हा भेद नष्ट करणे, हे उद्दिष्ट ठेवून त्यानुसार या मर्यादा मध्ये बदल करण्यात यावा.

आज आपण पाहतो की काही व्यक्तींचे उत्पन्न शून्य तर काही व्यक्तींचे करोडो रु. हे लक्षात घ्यावे व प्रमाण - दहा या प्रमाणे हा फरक असावा व नंतर हळूहळू नष्ट, प्रमाण आठ असे करत करत समान उत्पन्नात बरोबरी साधावी असे गांधीजींनी सुचविले आहे.

5) उत्पादन - समाजहितासाठी ~~असावे~~ निर्माण व्हावे

गांधीजींच्या या योजनेनुसार उत्पादनाचे स्वरूप वैयक्तिक प्रेरणा, इच्छा किंवा लोभ याने न ठरता सामाजिक गरजेनुसार ठरविले जाईल. सामाजिक गरजेनुसार उत्पादनाचा क्रम ठरविला जाईल, तो व्यक्तींच्या व उत्पादनाच्या गरजेनुसार ठरविला जाणार नाही.

स्वतः गांधीजी विश्वस्त कल्पना साध्या, सोप्या भाषेत मांडली होती, ते म्हणत तुम्ही करोडो रुपये कमवा मिळवा, पण लक्षात ठेवा की, तुमची ही संपत्ती तुमची नाही. ती लोकांची आहे. तुमच्या न्याय्य गरजा भागविण्यासाठी आवश्यक ते तुम्ही घ्या. पण बाकीचे सारे समाजासाठी वापरा -

फेब्रुवारी 1916 मध्ये बनारस हिंदू विद्यापीठाच्या उद्घाटन प्रसंगी गांधीजींनी केलेल्या भाषणात विश्वस्त कल्पनेचा प्रथम उल्लेख केला होता. सामाजिकांना आवाहन करताना संपत्तीचे विश्वस्ताचे काम आहे असे समजावे, संपत्तीचा हितासाठी उत्पन्नाचा विनियोग जनतेच्या कल्याणासाठी

कारखानामालकांना संस्थानिकांना गांधीजींनी दिला होता. 1917 साली ही अहमदाबाद येथे गिरणी कामगारांच्या संपाच्या वेळी मालक व मजूर हे अखेर एकाच कुटुंबाचे घटक आहेत कामगारांनी कारखानदारांना पित्याच्या जागी कल्पून त्यांच्याकडे अपत्यांसारखी मागणी करावी. कारखानदारांनी कामगारांच्या कल्याणाची काळजी घ्यावी व संपाचा मार्ग न चोखाळता दोघांनी ही आपले वाद सामंजस्याने व वाटाघाटीच्या मार्गाने सोडवावेत, असे गांधीजी म्हणत होते.

विश्वस्त कल्पनेबद्दल गांधीजी म्हणतात की काही संपत्ती आहे ती निसर्गाची आहे. ती मनुष्याला सर्वशक्तीमान निसर्गाकडून मिळालेली आहे. माणसाजवळ जे काही आहे ती त्याची संपत्ती नव्हे तर जगाच्या सेवेसाठी त्याच्याकडे सोपविलेली ती संपत्ती आहे. कोणीही व्यक्तीजवळ स्वतःच्या गरजेपेक्षा जास्त मालमत्ता असेल तर तिने दुसऱ्यांच्या सेवेसाठी उपयोग करण्याकरता त्या मालमत्तेचे विश्वस्त बनावे. निसर्ग सर्वशक्तिमान आहे. तो कोणत्याही वस्तूचा संग्रह करत नाही. माणसानेही दररोज आपल्या गरजेप्रमाणे मिळवावे आणि उद्यासाठी संग्रह करू नये, तुम्हाला लागेल तेवढेच तुम्ही निसर्गाकडून घ्या निसर्गाला ओरबाडू नका नाहीतर उद्या तुम्हाला उद्याही पुरणार नाही. हाव केली तर विनाशात्मक आहे असे ते सुचवतात. व हे सर्व जर तुम्ही आत्मसात केले तर अपयशाच्या दृष्टीने ते विश्वस्ताचे मानले जाईल असे त्यांचे मत आहे. विश्वस्तपण ही भारताने जगाला दिलेली देणगी आहे. दरवेळी अहिंसेची इच्छा आहे. ~~आहे~~ धनसंग्रह टाळून विशुद्ध बुद्धी शिवाय शक्य नाही, धनसंचय हा वाईट मार्गावर नेऊन लोकांना संपत्ती देतो असे गांधीजींचे मत आहे.

उत्पादन साधनांवरील खाजगी मालकी व आर्थिक सत्तेच्या केंद्रीकरणाचे दुष्परिणाम नाहीसे करण्यासाठी गांधीजींनी विश्वस्त कल्पना मांडली, होती. त्यांच्या मते शेती, उद्योग व व्यापार यांच्याद्वारे जर एखाद्याने मोठ्या प्रमाणात संपत्ती गोळा केली असेल तर ती सर्व संपत्ती त्याच्या एकट्याच्या मालकीची नसते, मालकीची नसून ती संपूर्ण समाजाच्या मालकीची असते. ईश्वराने प्रकारे निर्माण केलेल्या संपत्तीचा काही भाग तो स्वतःसाठी खर्च करू शकतो इतर संपत्तीचा तो मालक नसतो

Scanned with OKEN Scanner

आशय – गांधीजींच्या मते श्रीमंत हे समाजाचे विश्वस्त मानून संपत्तीवर खाजगी मालकी, पण संपत्तीचा सार्वजनिक उपयोग हे तत्व सूचित करून गांधीजींनी विश्वस्ततेची कल्पना मांडली आहे. भांडवलशाही अर्थव्यवस्थेचे दोष नाहीसे करणे ही कल्पना विश्वस्त कल्पनेच्या मुळाशी आहे. भांडवलदार, कारखानदार, जमीनदार, सावकार, उद्योगपती, व्यापारी या सर्वांनीच विश्वस्त म्हणून काम करण्याचे आवाहन गांधीजींनी केले होते. या स्वरूपात कर्मचाऱ्यांच्या मोबदल्या प्रमाणे आपला पगार निश्चित करावा व तो नफ्यामधून काढून घ्यावा, बाकी सर्व नफा लोककल्याणकारी योजनांवर खर्च करावा असे आवाहन सांगितले. वकील, सर्व मेडिकल क्षेत्र लोकांची संपत्ती गुणांनी हृदय परिवर्तन किंवा संपत्तीचे हस्तांतरण करण्यासाठी, हिंसेचा वापर करणे हे गांधीजींना मान्य नव्हते.

म्हणजे भांडवलदार वर्गाचे शोषण थांबविण्यासाठी राष्ट्रीयीकरणास अहिंसक पर्याय म्हणून गांधींनी ही संकल्पना मांडली होती. या संकल्पनेचे सर्व यश भांडवलदार, कारखानदार यांच्या हृदय परिवर्तनावर अवलंबून होते. ही विश्वस्त योजना मान्य न करणाऱ्या व्यापाऱ्यांच्या मालकीवर बहिष्कार टाकण्याचे व सत्याग्रहाचा अवलंब करण्याचे आवाहन गांधींनी केले होते.

विश्वस्त कल्पनेचा उगम

म. गांधींच्या विश्वस्त कल्पनेचा उगम ख्रिश्चन धर्मग्रंथात आहे. जगातील प्रत्येक सर्व वस्तूवर शेवटी परमेश्वराची सत्ता आहे. माणसाला त्याने फक्त उपभोगाचा अधिकार दिला आहे. स्वतःच्या व्यवसायात माणसाला जे यश मिळते ते परमेश्वराच्या साहाय्याने मिळालेल्या कृपेचे लक्षण आहे. या संपत्तीचा वापर स्वतःच्या सुखोपभोगासाठी करणे हे पाप आहे. स्वतःकडील धन गरिबांना देऊन परमेश्वराला देण्यासाठी खर्च करावे लागते. ही तत्वे ख्रिश्चन धर्मविचारातील मुख्य तत्वे आहेत. हिंदू धर्मातील तत्वे गांधीजींच्या विश्वस्त कल्पनेत आहेत. श्रीमंतांनी आपली सर्व संपत्ती समाजाच्या मालकीची आहे असे समजून स्वतःला या संपत्तीचे विश्वस्त समजून स्वतःच्या किमान गरजा भागवून उरलेली स्वतःसाठी खर्च करून बाकी सर्व संपत्तीचा विनियोग समाजाच्या कल्याणासाठी करावा असा विचार मांडला. म्हणजे ख्रिश्चन धर्मातून गांधीजींनी घेतलेली प्रेरणा

## डॉ. आंबेडकरांचा विरोध —

म. गांधीजींच्या विश्वस्त कल्पनेस डॉ. आंबेडकरांचा विरोध होता – ही कल्पना त्यांना हास्यास्पद वाटत होती. ही कल्पना नैतिकदृष्ट्या आदर्शवादी असली तरी (1) त्यात शास्त्रीय दृष्टिकोनाचा व शास्त्रशुद्ध विश्लेषणाचा अभाव होता (2) ही कल्पना भ्रामक स्वरूपाची होती. (3) मानवी स्वभावाविरुद्ध होती अशी टीका त्यांनी केली

~~सारांश~~ समारोप —

विश्वस्त कल्पनेमागे आदर्शवाद व नैतिक तत्त्वे होती. भौतिक संपत्तीमुळे मानवी जीवन सुखी होते हे मत गांधीजींना मान्य नव्हते. पाश्चात्य देशातील भौतिकवादामुळे व्यक्ती व समाजाचे नैतिक व आध्यात्मिक अधःपतन होत आहे. असे गांधीजींचे मत होते. संपत्तीच्या मागे असलेली व्यक्तीची लालसा, स्वार्थ नष्ट व्हावा व संपत्ती ही समाजाच्या हितासाठी वापरावी असे सांगून आग्रहाने सांगितलेले कायद्याने पाऊल ओढून जमीनदारांनी स्वतःच्या वृत्तीत बदल केला नाही तर सशस्त्र क्रांती होऊन सर्व सत्ता जमीनदारांना सोडावी लागणार अशा इशारा सुद्धा त्यांनी जमीनदारांना दिला होता. पण प्रत्यक्षात जमीनदार विरुद्ध सशस्त्र लढे उभे राहिले नाहीत.

गांधीजींची विश्वस्त कल्पना ही पोकळ नैतिक ~~कल्प~~ प्रार्थना ठरली. स्वातंत्र्यानंतर भारतातील श्रीमंत वर्गाकडून फारसा प्रतिसाद मिळाला नाही. यामुळे समाजातील आर्थिक विषमता शोषण जसेच्या तसे कायम राहिले, नैतिक आचरणाद्वारे हृदयपालट घडवून कामगार व मालक कल्याण साधणे हा विचार विश्वस्त कल्पनेच्या मुळाशी होता.

स्वतः गांधीजींना या कल्पनेबद्दल महत्त्व होते. मात्र विश्वस्त कल्पना कृतीच्या स्वरूपात किंवा त्यांच्या मनातील स्वरूप प्रत्यक्षात ~~आली~~ म्हणून स्वतंत्र पाऊल पडले नाही. कारण सिद्धांत विकून गेले तरी हा कायदा राहील. उलट त्यांच्या मुळाशी धर्म व तत्त्वज्ञान आहे. श्रीमंतांनी त्याचे पालन न केल्याने ते तत्त्व खोटे आहे असे म्हणता येणार नाही. फक्त त्यांचे दुबळेपण सिद्ध होईल.